REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2021

# नागपूरजिल्हयाचा ग्रामीण भागाचा संस्थात्मक विकासात नाबार्डची भूमिका: एक अध्ययन

प्रा. कल्पना कांतीलाल पटेल
वाणिज्य विभाग,
एस. एन. टी. महाविद्यालय, रामटेक.

## सारांश



या अध्ययना मध्ये संशोधिकेने नाबार्डने नागपूर जिल्हयातीलकृषीक्षेत्र व ग्रामीण भागाच्यासंस्थात्मकविकासासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास केला आहे. त्या अभ्यासामध्ये त्यांना असे दिसून आले की, कृषिक्षेत्राला आधार देण्यासाठी आणि ग्रामीण भागातील विषमता दूर करण्यासाठी मागासभागासह इतर भागामध्ये देखील आश्यक तो वित्तपुरवठा नाबार्ड करते. यासाठी नाबार्डने विविध योजना, त्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नाबार्डने बँकांच्या माध्यमातून वित्तपुरवठा केला आहे.

## प्रस्तावना

कृषिप्रधान भारताला देशाच्या कृषी क्षेत्राकडे आणि ग्रामीण उद्योगाकडे पुरेसे लक्ष देवून त्यांच्या विकासाद्वारे ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देऊ शकेल अशा बँकेची देशाला गरज होती. स्वातंत्र्यानंतरच्या काळात देशाच्या कृषी आणि ग्रामीण उद्योगाच्या विकासाकडे पुरेसे. लक्ष देऊ शकेल अशा स्वतंत्र बँकेची स्थापना करण्याविषयीच्या सुचना विविध तज्ज्ञ समित्यांनी केल्या होत्या. देशात कार्य करणाऱ्या विविध सार्वजनिक व व्यापारी बँका, सहकारी बँका आणि अन्य संस्था, कृषी विकासाला आणि ग्रामीण उद्योगांना मदत करीत असल्या तरी, त्यांचे कार्य अपुरे होते. त्यामुळे केंद्रसरकारने कृषी क्षेत्र आणि ग्रामीण उद्योगाची गरज जाणून त्यांच्या विकासासाठी पुरेसा अर्थपुरवठा करू शकेल यासाठी स्वतंत्र बँक स्थापण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १२ जुलै १९८२ मध्ये लोकसभेत स्वतंत्र विधेयक संमत करून राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना करण्यात आली.

या बँकेच्या स्थापनेमुळे कृषी क्षेत्राची गरज जाणून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर्ज पुरवठा करणे, सहकारी क्षेत्राला अर्थ पुरवठा करणाऱ्या विविध संस्था

आणि सहकारी संस्थांच्या कार्यात समन्वय साधने नाबार्डमुळे शक्य झाले. तसेच ग्रामीण भागात लघु उद्योग, हस्तकला आणि स्वयंरोजगार क्षेत्रास कर्ज पुरविण्याचे कार्य पुर्वीपेक्षा अधिक वेगाने करणे नाबार्डमुळे शक्य होणार होते. नाबार्ड बँकेच्या स्थापनेनंतर रिझर्व्ह बँक ग्रामीण विकासाच्या दृष्टीने पुर्वी करीत असलेल्या कार्याची जबाबदारी आता या संस्थेवर आली आहे. त्यामुळे आता सहकारी पतपुरवठा रचनेची शिखर बँक म्हणून नाबार्डकडे विशेष महत्वाची कामगिरी आली आहे. पुर्वी कृषी विकासासाठी कृषी पुर्नवित्त व विकास महामंडळ आणि रिझर्व्ह बँकेतील जो विभाग सहकारी आणि ग्रामीण बँकांना पतपुरवठा करण्याचे काम करीत होता, त्या दोन्हींची कार्ये नाबार्डकडे देण्यात आले.

ग्रामीण भागातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी पतपुरवठा करणे, लघु उद्योगाचा विकास करणे, ग्रामीण व कुटीरोउद्योगांचा विकास साधने आणि ग्रामीण विकासाचे इतर कार्यक्रम चालविणे या संबंधी धोरणे ठरविणे, योजना आखणे व त्याची कार्यवाही करणे, याबाबत नाबार्ड ही सर्वोच्च संस्था आहे. यासंबंधी देशाच्या कृषी आणि ग्रामीण विकासाच्या कार्यासाठी आवश्यक निधी पुरविण्याच्या दृष्टीने नाबार्ड या संस्थेस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## नागपूरजिल्हयाचा ग्रामीण विकासासाठी नाबार्डची आवश्यकता :

रिझर्व्ह बँकेने कृषी व ग्रामीण विकासाकरिता पतपुरवठ्याबाबत केलेले कार्य फार महत्त्वाचे आहे. यासाठी अनेक योजना रिझर्व्ह बँकेने राबविल्या आहेत. सहकारी पतपुरवठा संस्थांच्यामार्फत कृषिला कर्ज देण्याचे काम रिझर्व्ह बँकेने केले. सन १९६३ मध्ये 'कृषी पुनर्वित्त" व विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. कृषिला दीर्घकालीन कर्ज पुरवठा करणे व पुनर्वित्ताच्या सोयी उपलब्ध करून देणे ही प्रमुख जबाबदारी या महामंडळावर होती.

तथापि पुढील काळात कृषिच्या विकासाची कल्पना अधिक व्यापक करून ती ग्रामीण विकासाच्या कल्पनेत परीवर्तित करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण पतपुरपठ्याचा वेगाने विस्तार होण्याची आवश्यकता रिझर्व्ह बँकेला वाटप होती. कृषी व ग्रामीण भागाच्या विकासाकरिता पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या कार्यात एकसुत्रीपणा निर्माण करणे व त्यांच्या कार्याला योग्य दिशा देणे या बदलेल्या संदर्भात राष्ट्रीय स्तरावर एखादी स्वतंत्र 'शिखर बँक' स्थापनेची गरज वाटु लागली. म्हणूनच १२ जुलै १९८२ या दिवशी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची (नाबार्ड) स्थापना करण्यात आली.

रिझर्व्ह बँकेशी जोडलेल्या पुर्वीच्या सर्व संस्थांचे (कृषिविषयक) कार्य या बँकेच्या हाती आले. सन १९७५ मध्ये निर्माण करण्यात आलेल्या क्षेत्रीय ग्रामीण बँकांची जबाबदारी ही नाबार्डकडचे सोपविण्यात आली आहे.

ग्रामीण भागाचा समन्वित विकास करून त्यात समृद्धी आणण्याचा दृष्टीने कृषी, लघु उद्योग, ग्रामोउद्योग व इतर आर्थिक उपक्रमांना मदतीचा हात देण्याच्या हेतूने सध्या नाबार्ड काम करीत आहे. त्यामुळे भारताचा ग्रामीण विकास करण्यासाठी नाबार्डची आवश्यकता आहेच हे सिद्ध झाले आहे.

## नागपूरजिल्हयाचा ग्रामीण विकासात नाबार्डच्या कार्याची भूमिका :

भारताच्या ग्रामीण विकासाच्या व्यापक संदर्भात नाबार्डला जी भूमिका पार पाडावी लागते किंवा जी कामे करावी लागतात आणि जबाबदारी पार पाडावी लागते ती पुढीलप्रमाणे आहे.

अ) कृषी आणि ग्रामीण भागाचा विकास हा प्रश्न केवळ वित्त पुरवठ्याने सुटणारा नाही. त्या-त्या विभागामध्ये एकूण परिस्थिती कशी आहे व कोणते प्रकल्प किंवा व्यवसाय यशस्वी होऊ शकतात, कृषी व प्रचलित व्यवसायांची कार्यक्षमता वाढून ते फायदेशीर होण्यासाठी उत्पादन-तंत्रात कोणते बदल करावेत यासारखे प्रश्न ग्रामीण विकासाशी संबंधित आहेत. ते सोडविण्यासाठी संशोधन करणे हे नाबार्डचे काम आहे.

ब) कुटीरोद्योग, ग्रामोद्योग आणि लघूउद्योग, ग्रामीण कारागीरांचे व्यवसाय आणि इतर छोटे व्यवसाय हे ग्रामीण विकासाचे महत्त्वपुर्ण अंग आहेत. त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून अनेक पातळीवर प्रयत्न केले जातात. केंद्र सरकार, नियोजन मंडळ, निरनिराळ्याा केंद्रीय संस्था व मंडळे, राज्य सरकार आणि त्यांची मंडळे हे ग्रामीण विकासासाठी जे प्रयत्न करतात ते वेगवेगळे असले तरी त्यांचा खरा उद्देश समान आहे; त्यामुळे या सर्वांच्या प्रयत्नामध्ये समन्वय साधणे हे नाबार्डचे प्रमुख काम आहे.

क) ग्रामीण क्षेत्रातील कृषिसह इतर व्यवसायांच्या विकासासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज मिळणे अतिशय आवश्यक आहे. हे कर्ज १५ ते २५ वर्षाच्या मुदतीचे असू शकते. राज्य सरकारांना, विविध सरकारी संस्थांना आणि मान्यता प्राप्त इतर संस्थांना त्यासाठी कर्ज देणे हे नाबार्डचे काम आहे. अशा संस्थांच्या भाग भांडवलात किंवा कर्ज रोख्यामध्ये योगदान देण्याचे कामही ती करते.

ड) पुनर्वित्त सुविधा उपलब्ध करून देणे हे नाबार्डचे अतिशय महत्त्वाचे काम आहे. राज्य सरकारे, राज्य सहकारी बँका आणि प्रादेशिका ग्रामीण बँका यांना ही सुविधा मिळते. अल्पकालीन व मध्यमकालीन कर्ज पुरवठा करता यावा म्हणून नाबार्डने २००६-०७ मध्ये राज्य सहकारी बँका व ग्रामीण बँकांना एकूण १४,६०० कोटी रूपये पुनर्वित्त उपलब्ध करून दिले होते. दुर्बल सहकारी संस्थांच्या भागभांडवलात राज्य सरकारांना योगदान देता यावे. म्हणून नाबार्डने ३३५ कोटी रूपये दीर्घ मुदत-कर्ज म्हणून दिले होते. पुनर्वित्त सुविधेचा दुसरा भाग हंगामी अल्पकालीन गरजांशी संबंधित आहे हे कर्ज विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्या मध्यवर्ती सहकारी बँकांना मिळू शकते, तसेच खते किंवा इतर आदाने यांचा व्यवहार करणाऱ्या निरनिराळ्याा सहकारी संस्थांना देखील मिळू शकते.

इ) कृषिशिवाय इतर व्यवसायांना व कामांना नाबार्डच्या मदतीचा लाभ होतो आहे. त्यामध्ये दुग्धव्यवसाय, मत्स्य व्यवसाय, वराह पालन, फळ बागांचा विकास, शेतीचे यांत्रिकीकरण, लघुसिंचन इत्यादीचा उल्लेख करता येईल.

## निष्कर्ष

कृषी आणि ग्रामीण विकासाच्या संदर्भात जी केंद्रिय भूमिका भारतीय रिझर्व्ह बँक पार पाडीत होती. ती आता नाबार्ड या राष्ट्रीय बँकेकडे आली आहे. या अर्थाने ग्रामीण विकासाच्या क्षेत्रातील ती शिखर बँक तर आहेच; शिवाय पूर्वी पुनर्वित्त सुविधेचे जे काम रिझर्व्ह बँकेच्या 'कृषी पुनवित्त विकास

महामंडळाकडे' होते. ते नाबार्डकडे आल्यामुळे निरनिराळ्याा वित्तीय संस्थांना पुनर्वित्त सुविध पुरविणारी ती मुख्य बँक आहे. कृषी आणि ग्रामीण विकास यांच्यासाठी कर्ज उपलब्ध असते. यामुळे ग्रामीण विकासासाठी वित्त पुरवठा करण्याचे काम नाबार्ड करीत असल्यामुळे ग्रामीण विकास करण्यामध्ये नाबार्डचे महत्त्व वाढले आहे.

## संदर्भ सूची


१) आगलावे प्रदीप संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन,नागपूर १ जाने. २000
२) भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथनिर्मीत मंडळ,नागपुर. तृतीय आवृत्ती १९८७
३) संत दु.का. संशोधन पद्धती,प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै – १९८८
४) नाडगोंडे गुरूनाथ सामाजिक संशोधन पद्धती फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टो.१९९९
५) जरारे विजय एल. समाजिक शास्त्रीय संशोधन प्रणाली अद्वैत प्रकाशन,अकोला २२ ऑक्टो.२00४
६) घाटोळे रा.ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती मंगेश प्रकाशन, नागपूर पाचवी आवृत्ती १९९२
७) बोरूडे रा.र. संशोधन पद्धतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन सप्टें.२00५
८) राजनकर, प्रकाश, 'भारतीय बँकीग', पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, जूलै २0१४. पृष्ठ. २४१.
९) ढगे, एस. के., 'आधुनिक बँक व्यवसाय' के, एस. पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती जून २0१४, पृष्ठ – २६५.
१0) बिरदार, डॉ. माधव, 'सहकार', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जून २0१४, पृष्ठ – २१0.
११) निर्मळ, ए. बी., (२0१३), 'नाबार्डची परभणी जिल्ह्याच्या विकासातील भूमिका', अर्थशास्त्र विभाग, सामाजिक शास्त्रे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, नांदेड.
१२) वारूळकर, एन, आर., (२0१४), 'महाराष्ट्रातील शेती व ग्रामीण क्षेत्राच्या सुविधा विकासातील नाबार्डचे योगदान जळगाव जिल्ह्याचा चिकित्सक अभ्यास', अर्थशास्त्र विभाग, सामाजिक शास्त्रे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, जळगाव.
१३) चोन्दे, दिगांबर शिवाजीराव, (२0१५), 'ग्रामीण विकासातील राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) भूमिकेचे विश्लेषण', अर्थशास्त्र विभाग, सामाजिक शास्त्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, औरंगाबाद.
१४) पुरव, सामंत, (२00९), 'मायक्रोफायनान्स आणि महिला सक्षमीकरण', समाज प्रबोधन पत्रिका.